■ बीड (महाराष्ट्र) ■ सायं.दैनिक ■ मराठी ■ वर्ष - ०२ ■ अंक - ३०६ ■ गुरूवार दि.२४ जुलै २०२५ ■ आरएनआय - एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ ■ किंमत ३ रू. । पाने ४
■ Beed (Maharashtra) ■ Daily Evening ■ Marathi ■ Year - 02 ■ Issue - 306 ■ Thursday Dt. 24 July 2025 ■ RNI : MAHMAR/2023/83965 ■ Price - 3 Rupees ■ Pages 4

# नागोबा देवालय मंदिराच्या जमिनीवर बेग यांचा षड्यंत्रकारी हस्तक्षेप? खरेदी-विक्रीचे बनावट बॉण्ड पेपर प्रकरण उघड!

## मंदिराच्या जागेवर घर कोणाचे, नागरिकांमध्ये खळबळ, चर्चेला उधाण; संवेदनशील प्रकरणात प्रशासन कधी जागे होणार?

अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
आरंभ
संपादक : दिपक थोरात Mob.9860898564



# कागदावर स्थलांतर, प्रत्यक्षात मंदिरच नाही; कबाड गल्लीत मोठा फसवणुकीचा प्रकार उघड?


## बॉण्ड पेपरवर नागोबा देवालय मंदिराचे बनावट स्थलांतर, मग प्रत्यक्ष मंदिर गेले कुठे?


## जाणीवपूर्वक दुर्लक्ष की मुद्दाम केलेली डील? जिल्हा प्रशासनाच्या भूमिकेवर संशयाची सावली!

बीड । प्रतिनिधी

बीड शहरातील एक धार्मिक श्रद्धेचा केंद्रबिंदू असलेल्या मंदिराच्या जमिनीची खरेदी-विक्री बोगस बॉण्ड पेपरवर करण्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. देवस्थानच्या मालकीची ही जमीन बेग यांनी खोटी कागदपत्रे तयार करून खरेदी-विक्रीचा बनाव केल्याचे समोर आले आहे. जागा उपयोगात नाही, मुस्लिम वस्ती झालेली आहे तुम्हाला अडचण होऊ शकते म्हणून नागोबा देवालयाचे ट्रस्टी यांना मंदिराची जमीन करणे भाग पाडणारे बेग यांनी मंदिराची जमीन बांड पेपरवर खरेदी विक्री करण्याचे षडयंत्र करून भविष्यात आपल्यावर कोणतीही अडचण निर्माण होऊ नये म्हणून मोठ्या षडयंत्र केल्याचे समोर येत आहे. त्या बॉण्ड पेपर वर नागोबा देवालय कबाड गल्ली बीड या ठिकाणी स्थलांतर दाखविण्याचे षडयंत्र करण्यात आले आहे परंतु मुळात हे स्थलांतर झाले नाही तर मंदिर गेले कुठे हे प्रश्न मोठ्याने उपस्थित होत आहे कारण की कागदी वेस खासबाग परिसरात नागोबा देवालयाचे जे मंदिर होते त्या ठिकाणी आत्ता मोठे घर बांधण्यात आल्याचे दिसून येत आहे हे घर कुणाचे आहे हे चर्चेचा विषय ठरत असून नागोबा देवालाचे प्रकरण अत्यंत संवेदनशील असताना या प्रकरणात आत्तापर्यंत ही प्रशासनाकडून दखल घेण्यात आली नाही हे आश्चर्याची वाट प्रशासनाने या प्रकरणात तत्काळ दाखल घेऊन त्या जागेचा पंचनामा करून मंदिराचे जागेवर जे कुणी घर बांधले आहे त्यांना अटक करण्यासोबत या प्रकरणाचा खुलासा होईपर्यंत ती जागा आपल्या त्याब्यात घेणे गरजेचे दिसून येते या प्रकरणात मुख्य सूत्रधार संस्थाचालक सईद बेग हेच असून त्यांनाही अटक केल्याशिवाय या प्रकरणाचा खुलासा होणार नाही.

याबाबत अधिक माहिती अशी की, शहरातील कागदी वेळेस परिसरात खासबागचे नालेजवळ सर्वे नंबर १२३ मध्ये नागोबाचे देवालय होता जे ट्रस्टी यांची संगमने संस्थाचालक सईद बेग नष्ट करण्याचे काम केल्याचे समोर आले आहे कारण की ज्या प्रकरणात जे महत्त्वाचे पुरावा दैनिकाच्या हाती लागले असून ते करारनामा दिनांक सात नोव्हेंबर २००९ रोजीचे आहे यामध्ये मुस्लिम वस्तीचा कारण दाखवून नागोबा देवालाचे ट्रस्टी यांना मंदिराची जमीन विक्री करण्याचे भाग पाडण्याचे काम मल्टीपर्पज युथ असोसिएशनचे अध्यक्ष मिर्झा अश्रफ सईद बेग यांनी केले आहे. सदरील जागा हडप करण्यासाठी सईद बेग यांनी ट्रस्टी यांना मुस्लिम वस्तीचे कारण दाखवून मंदिर स्थलांतर करण्याचे खेळी दाखवून थेट देवालय कबाड गल्लीत स्थलांतर दाखविण्याचे षडयंत्र केले असून याबाबत माहिती घेतली असताना कबाड गल्लीत नागोबाची देवालय स्थलांतर झालेच नाही फक्त कागदपत्रावर स्थलांतर दाखविण्याचे षडयंत्र करण्यात आले आहे. ज्यामुळे हे प्रश्न उपस्थित होते की खासबाग परिसरातील सर्वे नंबर १२३ मधील नाल्या जवळचे नागोबाचे देवालय गेले कुठे कारण की त्या ठिकाणी आज मोठे घर बांधण्यात आल्याचे दिसून येत आहे. २००९ चे करारनाम्यात जे पी आर कार्ड आणि नगरपरिषद मालमत्ता क्रमांक देण्यात आले आहे त्यावर आजही नागोबा देवालय चा उल्लेख असल्याची माहिती समोर येत आहे तरी पण नागोबा देवालयाची जमीन पेपरवर खरेदी विक्री करण्यात आल्याची समोर येत असून याची सखोल चौकशी होणे अत्यंत गरजेचे दिसून येते याकरिता प्रशासनाने या संवेदनशील प्रकरणात तत्काळ दखल घेऊन त्या करारनाम्यावर ज्या ज्या व्यक्तींचे नाव नमूद आहे त्यांची सखोल चौकशी करून गुन्हा दाखल करणे गरजेचे दिसून येते तोपर्यंत सदरची जागा प्रशासनाने आपल्या ताब्यात घेतले तर योग्य राहतील.


भारतीय गैर न्यायिक
एक सौ रुपये
Rs. 100
रु. 100
ONE HUNDRED RUPEES
भारत INDIA
INDIA NON JUDICIAL
MAHARASHTRA
करारनामा


NOTARY
Adv. SAYED AZHAR ALI

# अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाने पुणे शहरातून केली अल्पवयीन पीडितेची सुटका व आरोपीला घेतले ताब्यात

## पीएसआय पल्लवी जाधव व त्यांच्या टीमने केली कारवाई

बीड । प्रतिनिधी

पोस्टे शिवाजीनगर गुन्हा रजिस्टर नंबर ६६/२०२५ कलम १३७(२), १४३(२) इछड हा दिनांक ०५/०२/२०२५ रोजी दाखल झाला होता. सदर गुन्हा हा ०२/०७/२०२५ रोजी अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाकडे वर्ग झाला. सदर गुन्ह्याच्या मूळ फाईलचे, तपास अधिकारी झडख पल्लवी जाधव यांनी बारकाईने अवलोकन केले. त्यानंतर पीडित मुलीच्या आईची व भावाची त्यांच्या राहत्या घरी जावून भेट घेतली व त्यांच्याकडून गुन्ह्या संबंधाने माहिती मिळवली. सदर माहितीच्या आधारे तांत्रीक पद्धतीने कौशल्यपूर्ण तपास करुन पीडित मुलगी व आरोपी यांचे लोकेशन पुणे येथे असल्याचे समजले. त्यावरून दिनांक १९/०७/२०२५ रोजी सकाळी -क्ढण ची टीम ही मा. एसपी सर यांच्या आदेशाने पुणे साठी रवाना झाली. पुणे शहरात लक्ष्मीनगर, वाल्हेकरवाडी येथील एका अपार्टमेंट

पान २ वर



# २५ लाखांचा रस्ता; काम न करताच उचलले दहा लाख




दौलावडगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील डोईठाण ग्रामपंचायत अंतर्गत येणाऱ्या पाटसरा रोड ते येळाबीबी हा एक हजार मीटरचा पादंण रस्ता न करता अर्ध बिल बोगस मजुराच्या माध्यमातून मस्टरद्वारे हडपण्यात आले असुन संबंधित गुत्तेदार, ग्रामरोजगार सेवकांसह इतरांवर कारवाई करण्यात यावी अशी मागणी होत आहे.

तालुक्यातील डोईठाण ग्रामपंचायत अंतर्गत दोन, तीन वर्षापुर्वी पाटसरा ते येळाबीबी वस्ती असा एक हजार मीटरचा २५ लाख रूपयांचा पाणंद रस्ता मंजूर केला होता. हा मंजूर केलेला

पान २ वर

# नेकनूर पोलीसांनी पकडला लाखोंचा गुटखा

नेकनूर । प्रतिनिधी

मागील काही दिवसांपासून अवैध धंद्यावर निर्बंध आले असले तरी गुटख्याची विक्री मात्र तेजीत सुरु होती. शहरात आणि गल्लीबोळात ही टपऱ्यावर गुटखा आरामात मिळत असल्याचे चित्र असताना मध्यरात्री १ च्या सुमारास धुळे-सोलापूर हायवेवरील वानगाव शिवारात नेकनूर पोलिसांनी लाखोंचा गुटखा ताब्यात घेतला आहे. रजनीगंधा, बाबा आणि विमल कंपन्याचा हा गुटखा असल्याची माहिती आहे.

सहाय्यक पोलीस निरीक्षक चंद्रकांत गोसावी यांना आयशर टेम्पोतून गुटखा येतं असल्याची माहिती मिळाल्यानंतर मध्यरात्री १ च्या सुमारास सापळा रचून ही

पान २ वर



## अवैध धंद्यांना पायबंद घालण्याची नेकनूर पोलिसांची ठाम भूमिका : सपोनि गोसावी



गुटखा तस्करीप्रकरणी झालेली ही कारवाई बीडचे पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांच्या संकल्पना व कुशल मार्गदर्शनाखाली पार पडली असुन या प्रकरणावर प्रतिक्रिया देताना नेकनूर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक चंद्रकांत गोसावी यांनी बोलताना सांगितले की गुटखा तस्करांविरोधात ही केवळ सुरुवात आहे. पुढे असे कोणतेही अवैध धंदे सहन केले जाणार नाहीत. पोलीस दल अशा कारवायांबाबत सजग असून, कठोर पावले उचलली जातील.

# बीडमध्ये अवैध वाळू उत्खननावरून खळबळ

## अधिकाऱ्यांविरुद्ध केली विभागीय आयुक्त यांच्याकडे केली तक्रार

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात अवैध गौण खनिज,विशेषतः वाळू उत्खनन मोठ्या प्रमाणावर सुरू असून, प्रशासनाच्या निष्क्रियतेमुळे या प्रकाराला अधिक चालना मिळत असल्याचे आरोप होत आहेत. या पार्श्वभूमीवर भ्रष्टाचार निर्मूलन समिती मराठवाड्याचे अध्यक्ष अशोक कातखडे यांनी दिनांक २१ जुलै २०२५ रोजी विभागीय आयुक्त छत्रपती संभाजीनगर, जिल्हाधिकारी बीड व खनिकर्म अधिकारी बीड यांच्याकडे गंभीर तक्रार दाखल केली आहे.

या तक्रारीनुसार, प्रशांत जाधवर (नायब तहसीलदार, महसूल-२, बीड) यांची पथक प्रमुख म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. परंतु ही नियुक्ती रद्द करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. नियुक्ती करणाऱ्या उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांच्यावर व नियुक्ती प्रक्रियेत सहभागी आसणारे अधिकारी यांच्याविरुद्ध देखील कारवाई करण्यात यावी, असे या तक्रारीत स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे.



तक्रारीमध्ये नमूद केल्याप्रमाणे, निमगाव (मा) येथील सिंदफना नदीपात्रात मोठ्या प्रमाणावर अवैध वाळू उपसा सुरू आहे. याबाबतचे जीओ-टॅग फोटोज पुरावा म्हणून तक्रारीसह जोडले गेले आहेत.या ठिकाणी संबंधित महसूल अधिकारी आणि तहसीलदार यांनी तसेच त्यांच्या अधिनिस्त आसलेले कर्मचारी यांनी अद्याप एकही कारवाई केली नसल्याचेही निदर्शनास आले आहे.

अशोक कातखडे यांनी प्रशांत जाधवर यांच्या पूर्वीच्या कार्यकाळावरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. त्यांचा कार्यकाळ गेवराई आणि शिरूर (का) येथे वादग्रस्त आणि निष्क्रिय राहिल्याचे नमूद करण्यात आले आहे. तसेच, त्यांचे अनेक वाळू माफियांशी संबंध असल्याचा संशय व्यक्त करत त्यांचे मोबाईल कॉल डिटेल्स व उऊठ तपासावेत, अशी मागणी तक्रारीतून करण्यात आली आहे. प्रशांत जाधवर यांच्या नियुक्तीबाबत उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांनी कोणत्या निकषांवर निवड केली, हे स्पष्ट नसून ही संपूर्ण प्रक्रिया संशयास्पद असल्याचेही यात नमूद आहे. त्यामुळे ही नियुक्ती रद्द करून दोषी अधिकाऱ्यांवर तातडीने कारवाई व्हावी,अशी जोरदार मागणी करण्यात आली आहे.

या तक्रारीमुळे संपूर्ण जिल्ह्यात एकच खळबळ उडाली असून, प्रशासन आता कोणती भूमिका घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.अवैध वाळू गौण खनिज उत्खनन रोखण्यासाठी नेमणूक केलेल्या अधिकाऱ्यांच्याच पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाल्याने,ही बाब प्रशासनासाठी अत्यंत संवेदनशील बनली आहे.शेवटपर्यंत या प्रकरणाचा पाठपुरावा करण्यात येणार आहे.आसे अशोक कातखडे भ्रष्टाचार निर्मूलन समिती मराठवाडा अध्यक्ष यांनी सांगितले आहे.

# टायगर ग्रुप जिल्हाध्यक्ष राकेश जाधव यांच्या पुढाकाराने महिलेला मिळाला न्याय

## दिन दुबळ्याच्या, गोरगरिबांच्या सेवेसाठी टायगर ग्रुप सदैव तत्पर : जाधव

बीड । प्रतिनिधी

परळी येथील श्रीनाथ गोविंद गित्ते हे प्राथमिक आश्रमशाळा वसंतनगर, ता. परळी जि. बीड या शाळेत प्रादेशिक उपसंचालक, इतर मागास बहुजन कल्याण (प्रादेशिक विभाग) छत्रपती संभाजीनगर यांचे आदेश दि.३ जुलै २०२५ नुसार शाळेवर रुजू होण्यासाठी वारंवार जाऊन देखील गीते यांना रुजू करून घेत नसल्याने टायगर ग्रुप जिल्हाध्यक्ष राकेश जाधव यांनी पुढाकार घेऊन श्रीनाथ गोविंद गीते यांच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहिले होते.



आश्रम शाळा व्यवस्थापन व समाज कल्याण बीड मधील अधिकाऱ्याला भ्रष्टाचारणे बरबटल्याने गोविंद गीते यास सेवेवर करून घेण्यास टाळाटाळ केली जात होती. पतीच्या निधनानंतर अनुकंपावर घरातील कुठलाही व्यक्तीस वारसदाराला सेवेत घेतले जाते. सुनीता गीते यांनी प्रचंड संघर्ष करुन स्वतः वरिष्ठ कार्यालयाच्या पायऱ्या झिजवल्या,वरिष्ठांनी रुजू करुन देण्याचे आदेशही दिले. मात्र बीड येथे भ्रष्टाचाराची कीड खूप मोठ्या प्रमाणात वाढली आहे. श्रीनाथ गीते यांना अद्याप नोकरी वरती रुजू करून घेतला नाही. सुनीता गीते या स्वतः कर्करोगाने त्रस्त असुन उपचारासाठी आर्थिक अडचण आहे. मागील अनेक वर्षांपासुन पाठपुरावा करुन मुलाला अनुकंपावर नियुक्ती आदेश दिले असताना देखील संबंधीत शाळा रुजू करुन घेण्यास मनाई करत आहेत. संबंधीत शाळेवर अथवा बीड जिल्हयात कोणत्याही शाळेत अथवा कार्यालयात गोविंद गीते यांना दि.२१/०७/२०२५ पर्यंत रुजु करून न घेतल्यास कार्यालयासमोर दि.२३/०७/२०२५ रोजी आत्मदहन करण्याचा इशारा देण्यात आला होता. परंतु टायगर ग्रुप जिल्हाध्यक्ष राकेश जाधव यांच्या पुढाकाराने समाज कल्याण आयुक्त यांनी लेखी स्वरूपात दिले. राकेश जाधव यांच्या पुढाकारामुळे आज मला व कुटुंबाला न्याय मिळाल्याचे सुनिता गीते यांनी प्रसार माध्यमाना सांगत राकेश जाधव यांचे आभार मानले.

# महाराष्ट्र आधार सेना युवा तालुका कार्याध्यक्षपदी कृष्णा इचके





वडवणी । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यामध्ये ना जातीचा ना धर्माचा एखादा मदतीचा हीच ब्रीदवाक्य घेऊन आज दीपक थोरात यांनी स्थापन केलेले सामाजिक संघटना जनसेवेसाठी कटिबद्ध आहे. वडवणी तालुक्यातील उपळी या गावचे युवक नेते सर्वसामान्यांच्या मदतीला धावून जाणारे कृष्ण इचके, बळी इचके, नारायण पाटोळे यांनी यांनी दीपक थोरात यांच्या वरती विश्वास ठेवून महाराष्ट्र आदर्शने मधील प्रवेश केला.

यावेळी कृष्णाई यांची सर्वांच्या विचार विनिमयानंतर महाराष्ट्र आधार सेना वडवणी तालुका युवक कार्याध्यक्षपदी कृष्णा इचके यांची निवड करण्यात आली आहे. यावेळी कृष्णा इचके, भगवान पाटोळे, बळी इचके यांची महाराष्ट्र आधार सेनेच्या संपर्क कार्यालय बीड येथे प्रवेश संपन्न झाला. यावेळी महाराष्ट्र आदर्श सेनेचे संस्थापक अध्यक्ष तथा महाराष्ट्र आरंभ चे संपादक दीपक थोरात, कार्याध्यक्ष उद्धव आरे, वडवणी तालुका अध्यक्ष सतीश हानवते, अशोक आबा वाघमारे, करण सरवदे, अर्जुन सरवदे, युवा उपजिल्हा प्रमुख अनिल आवाड बाबू हतागळे, अभिषेक अडागळे यांनी पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

# लॉर्ड महावीर इंग्लिश स्कूलचे तीन विद्यार्थी पुण्यातील सीएसआयआर लॅबमध्ये बनले एक दिवसाचे शास्त्रज्ञ

कडा । प्रतिनिधी

येथील वर्धमान महावीर चॅरिटेबल ट्रस्ट संचलित महावीर इंग्लिश स्कूल या सीबीएसई बोर्ड मान्यताप्राप्त शाळेचे तीन विद्यार्थी माननीय पंतप्रधान आणि सीएसआयआरचे अध्यक्ष श्री. नरेंद्रजी मोदी यांनी २३ फेब्रुवारी २०२५ रोजी त्यांच्या ११९ व्या मन की बात कार्यक्रमात विद्यार्थ्यांना एक दिवस एक शास्त्रज्ञ म्हणून घालवा आणि एक व्यक्ती असल्याचा अनुभव घेण्याचा सल्ला दिला होता. त्याला अनुसरून दहावीची अक्षरा गांधी, नववीची निशिता नहार आणि आठवीतील शौर्य अंदुरे या तीन विद्यार्थ्यांची बीड जिल्ह्यातून या कार्यक्रमासाठी निवड झाली होती. त्यांनी सोमवार, २१ जुलै २०२५ रोजी सीएसआयआर, पुणे येथे त्यांच्या



जिज्ञासा कार्यक्रमामध्ये सहभाग घेतला. यामध्ये विद्यार्थी शास्त्रज्ञ संवाद कार्यक्रम राबवण्यात आला.

त्यामध्ये अत्याधुनिक सुविधांचा अनुभव त्याचबरोबर प्रयोगशाळेशी थेट संवाद साधण्याची संधी विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्यात आली. या कार्यक्रमामधे एक दिवस एक शास्त्रज्ञ म्हणून हे विज्ञान समाजावर कसा परिणाम करते आणि तांत्रिक प्रगती कशी चालते याचा सखोल अभ्यास विद्यार्थ्यांनी या कार्यशाळेत केला.

त्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष अमितजी राठोड, उपाध्यक्ष संदिपजी चानोदीया, सचिव हेमंतजी मेहेर, कोषाध्यक्ष डॉ. प्रमोदजी भळगट तसेच संस्थेचे इतर पदाधिकारी मनीषजी गांधी, प्रकाशजी श्रीश्रीमाळ, अमोलजी पटवा, संजयजी पितळे, संतोषजी गांधी, मुख्याध्यापक अभिलाष के.के, सल्लागार मेहेर सर आणि सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# बीड जिल्ह्यातील नोंदणीकृत गोशाळांना नोंदणी प्रमाणपत्र वितरण समारंभ संपन्न

बीड । प्रतिनिधी



महाराष्ट्र गोसेवा आयोग महाराष्ट्र शासन व पशुसंवर्धन विभाग महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवार दि.२३ जुलै २०२५ रोजी पशुसंवर्धन आयुक्त कार्यालय बीड येथे बीड जिल्ह्यातील एकूण ५३ नोंदणीकृत गोशाळांचे नोंदणी प्रमाणपत्र वितरणाचा कार्यक्रम महाराष्ट्र गोसेवा आयोगाचे शासकीय सदस्य श्री उद्धवजी नेरकर व डॉ. दिलीप मोरे यांच्या हस्ते सदर प्रमाणपत्र वितरणाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

महाराष्ट्र गोसेवा आयोगाच्या वतीने बीड जिल्ह्यातील गोशाळांना नोंदणी प्रमाणपत्र वितरण सोहळ्याचे आयोजन बीड शहरातील सुभाष रोडवरील पशुसंवर्धन विभागाच्या कार्यालयात करण्यात आले होते. या कार्यक्रमास प्रमुख अतिथी उध्दवजी नेरकर, सदस्य, महाराष्ट्र गोसेवा आयोग, महाराष्ट्र राज्य, डॉ. आर.डी. कदम, जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त बीड, डॉ. दिलीप मोरे, सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन बीड, बाजीराव ढाकणे, बीड जिल्हा समन्वयक, महाएनजिओ फेडरेशन, महाराष्ट्र राज्य डॉ देशपांडे यांच्यासह बीड जिल्ह्यातील गोशाळेचे संचालक यांची उपस्थिती होती. सर्व ५३ गोशाळा संचालकांना नोंदणी प्रमाणपत्र देण्यात आली.



वडवणी येथील साहित्य सम्राट लोकशाहीर आण्णाभाऊ साठे चौकातील अतिक्रम हटवण्यात यावे यासाठी आज मानवी हक्क अभियान संघटनेच्या वतीने तहसीलदार व नगरपंचायत कार्यालयाकडे निवेदन देण्यात आले व अतिक्रमण न हटवल्यास संघटनेच्या वतीने आंदोलन करण्याचा इशारा देखील देण्यात आला व समवेत मानवी हक्क अभियान वडवणी तालुका अध्यक्ष विष्णू बप्पा मुजमुले ऊसतोड कामगार तालुका अध्यक्ष बप्पासाहेब पाटोळे युवा नेते बंडू नाना मुजमुले शहराध्यक्ष उद्धव आव्हाड सर्व सहकारी व आपला सहकारी आदर्श मुजमुले


# संसद इकरा हसन वर बेताळ वक्तव्य करणाऱ्या करणी सेनेच्या राष्ट्रीय उपाध्यक्ष योगेंद्र राणावर गुन्हा दाखल करा : शेख युनूस

बीड । प्रतिनिधी

भारताची संस्कृती ही महिलांच्या आदर करणारी संस्कृती आहे. सर्व धर्म स्त्रियांचा आदर करायला सांगत आहे आणि आपल्या भारत देशाच्या राष्ट्रपती सुद्धा एक महिला आहेत आणि महाराणा प्रताप सिंह हे स्त्रियांचे आदर करणारे राजा होते, आणि करणी सेना या संघटनेचे नाव करणी मातेच्या नावावरून ठेवण्यात आलेले आहे.



त्यांचेच राष्ट्रीय उपाध्यक्ष जर समाजवादी पार्टीच्या संसद इकरा हसन यांच्यावर बेताळ वक्तव्य करीत ' मी इकरा से निकाह कबूल फरमाता हू' आणि ओवीसीने मला जिजा म्हणायला पाहिजे. अशा व्यक्तीचे सर्वात प्रथम या संघटनेने त्यांच्या पदाचा राजीनामा घेतला पाहिजे. व त्यांच्यावर भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी साहेब, गृहमंत्री अमित शहा साहेब यांनी क्शन घेतली पाहिजे.



महाराष्ट्र आधार सेना युवा तालुका कार्याध्यक्षपदी कृष्णा इचके यांची निवड झाल्याबद्दल त्यांना शुभेच्छा देताना लक्ष्मण आवाड यांनी सत्कार करत शुभेच्छा दिल्या. यावेळी लक्ष्मण आवाड, बापू आवाड, बळी इचके.

# लोकशाहीर आण्णाभाऊ साठे सार्वजनिक जयंती उत्सव समितीची कार्यकारणी जाहीर

चकलांबा । प्रतिनिधी

लोकशाहीर आणि साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या जयंती उत्सव समितीची स्थापना करण्यात आली असून, साठे चौक येथील सर्व कार्यकर्ते बैठकीमध्ये प्रदिप ज्ञानोबा साळवे यांची अध्यक्षपदी आणि शंकर साळवे यांची सचिवपदी निवड करण्यात आली आहे. सहसचिवपदी संदीप साळवे, कोषाध्यक्षपदी रेवण गायकवाड आणि सदस्य म्हणून दत्ता सुभाष साळवे, अमोल साळवे, दादा साळवे, महेश साळवे, विलास साळवे, कार्तिक साळवे यांची निवड झाली आहे. अनिल कल्याण साळवे यांना उपाध्यक्ष म्हणून नियुक्त करण्यात आले आहे. यावेळी सर्व समाज बांधव उपस्थित होते.





या समितीद्वारे वंचित, बहुजन आणि शोषित समाजासाठी योगदान देणाऱ्या अण्णाभाऊ साठेंच्या सामाजिक, साहित्यिक आणि सांस्कृतिक कार्याचा प्रसार करण्यासाठी विविध उपक्रम आयोजित केले जातील. प्रदीप साळवे यांनी यावेळी सांगितले की, अण्णाभाऊ साठे हे वंचित समाजासाठी आदर्श व्यक्तिमत्व आहेत. त्यांच्या कार्याची जयंती उत्सव समितीद्वारे समाजापर्यंत पोहोचविणे हा आमचा उद्देश आहे. ही जयंती मोज मजा करण्यासाठी नाही तर सामाजिक उपक्रम करण्यासाठी पुढाकार घेण्यात येणार आहे. अनिल साळवे यांनीही सांगितले की, लोकशाहीर अण्णाभाऊ साठेंच्या कादंबऱ्या आणि साहित्याने समाजाला एकत्र करण्याचे काम केले आहे. त्यांच्या जयंती उत्सवातून त्यांच्या विचारांचा आणि संदेशाचा प्रसार व्हावा, यासाठी आम्ही कटीबद्ध आहोत. या उत्सवाद्वारे समाजातील शोषित घटकांना सशक्त करण्यासाठी आणि सामाजिक समतेसाठी काम करण्याचा निर्धार समितीने व्यक्त केला आहे. लवकरच या जयंती उत्सवाच्या निमित्ताने विविध सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित होणार आहेत.

# लोकमान्य टिळकांचे सार्वजनिक विचार आत्मसात करा : प्राचार्य केशव भांगे

शिरूर (का.) । प्रतिनिधी

दि.२३ जुलै २०२५ बुधवार रोजी, शिरूर (कासार) जि.बीड येथील कालिकादेवी माध्यमिक विद्यालयात,'लोकमान्य बाळ गंगाधर टिळक' यांची जयंती मोठ्या' उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा प्राचार्य केशव भांगे साहेब यांच्या हस्ते,'लोकमान्य बाळ गंगाधर टिळक' यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले.

या प्रसंगी प्राचार्य केशव भांगे साहेबांनी अध्यक्षीय भाषणातून,'लोकमान्य टिळक हे थोर स्वातंत्र्यसैनिक,शिक्षक व पत्रकार होते. त्यांची विचारसरणी जहालमतवादी होती. म्हणूनच त्यांनी भारताच्या स्वातंत्र्यासाठी ब्रिटिशांच्या विरोधात दंड थोपटले व 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे, आणि तो मी मिळविणारचं', अशी सिंव्हगर्जना केली. तसेच 'केसरी' व 'मराठा' वृत्तपत्राच्या माध्यमातून लोकांमध्ये राष्ट्रीयत्वाची भावना निर्माण केली आणि गणेशोत्सव व शिवजयंती हे उत्सव साजरे



करून आपणास सार्वजनिक विचार शिकविला. हाच लोकमान्य टिळकांचा सार्वजनिक विचार विद्यार्थी व शिक्षकांनी आत्मसात करावा. असे अभ्यासपूर्ण विचार अध्यक्षीय भाषणातून मांडले. यावेळी उपप्राचार्य प्रा.बसवेश्वर देशमाने यांनी प्रास्ताविकपर भाषणातून लोकमान्य टिळकांचे भारतीय स्वातंत्र्यासाठीचे योगदान मोठे होते. या विषयी माहिती सांगितली. तर सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ.आत्माराम झिंजुर्डे व विद्यार्थी प्रतिनिधी चि.शोयब आतार यांनी मनोगतं व्यक्त केले. त्यानंतर कालिकादेवी विद्यालयाने राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शनात सहभागी होण्यासाठीचा मान मिळविला. त्या बद्दल चि.शोयब आतार आणि विज्ञान शिक्षक, आबासाहेब ढवळे यांचा विद्यालयाच्या वतीने, प्राचार्य केशव भांगे साहेबांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

यावेळी उपप्राचार्य बसवेश्वर देशमाने, उपमुख्याद्यापक प्रकाश राठोड,पर्यवेक्षक जनार्दन काळे, विज्ञान विभाग प्रमुख, प्रा.संजय काकडे, परीक्षा विभाग प्रमुख प्रा.नामदेव तरकसे, प्रा.अशोक इनकर, प्रा.प्रशांत मळेकर, प्रा.अनिल जरे, प्रा.संजय आव्हाड, प्रा.नारायण घोलप, प्रा.बिभिषण घायाळ, प्रा.विश्वास ढाकणे, प्रा.महादेव हांगे, प्रा.दत्ता गायकवाड, प्रा.घनश्याम चव्हाण, प्रा.लक्ष्मण गव्हाणे, प्रा.दत्ता शिंदे, डॉ.सत्यनारायण ढवळे, डॉ.अशोक घोडके, प्रा.अशोक सवासे, प्रा.सुनिल मोरे, प्रा.शशिकांत जावळे, प्रा.हनुमंत घायाळ, प्रा.बाळासाहेब खटाणे, प्रा.अक्षय रणखांब, प्रा.अमर खोले, प्रा.सविता दराडे, प्रा.रेखा निर्मळ, प्रा.सिमा ढवळे, श्रीमती अनिता लाटे मॅडम, आबासाहेब ढवळे, रविंद्र बडे, बाळासाहेब येवले, वसंत आहेर, राजू बडे, जयेंद्र निकम, आप्पासाहेब कांबळे, नितीन बहिर, रोहित शिराळे, प्रशांत राऊत, रविंद्र गव्हाणे, सुंदर शिंदे, अक्षय साळवे, जितेश उगलमुगले, आदिनाथ काशिद, सुनिल खेडकर, विलास कांबळे, गौतम भोसले, इत्यादिंची उपस्थिती होती.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.विनोद गलांडे यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा.नारायण तांबे यांनी केले. विद्यालयातील सर्व कनिष्ठ प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पान १ वरून...

## अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाने पुणे शहरातून केली

च्या फ्लॅट मधे चिंचवड पोलीस ठाणेच्या हद्दीत पीडित मुलगी ही आरोपीच्या ताब्यात मिळून आली. सदर पीडीतेला व आरोपीला ताब्यात घेवून -क्ढण ची टीम बीड ला आली व त्यांना पुढील तपासकामी पोस्टे शिवाजीनगर येथे हजर केले.

सदर कार्यवाही ही पोलीस अधीक्षक नवनीत कावत सर, अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर सर यांच्या मार्गदर्शनाखाली झडख पल्लवी जाधव, पोलीस हवालदार उषा चौरे, हेमा वाघमारे, प्रदीप येवले, अशोक शिंदे, पोलीस शिपाई प्रदीप वीर व योगेश निर्धार सर्व अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्ष बीड यांनी केली.

## २५ लाखांचा रस्ता; काम न करताच उचलले दहा लाख

रस्ता न करता ग्रामरोजगार सेवक, ग्रामसेवक, सरपंच, उपसरपंच, पंचायत समितीतील अधिकारी यांनी संगनमत करून परिसरातील लोकांचे जॉबकार्ड घेऊन त्याच्या खात्यावर मस्टर उचलले. विशेष म्हणजे या ठिकाणी कसलेच काम करता दहा लाख रूपये उचल्याचा आरोप करण्यात आला असुन या कामाची चौकशी करून संबंधितांवर कायदेशीर कारवाई करावी अशी मागणी प्रल्हाद कृष्णा तरटे यांनी केली आहे.

**पावसाळ्यात वस्तीचा तुटतो संपर्क !**

पाटसरा ते येळाबीबी रोडवर लोकवस्ती असल्याने पावसाळ्यात ओढ्याला पाणी आले तर संपर्क तुटतोच, एवढेच नाही तर चिखल, पाण्यात लेकरांना शाळेत जाण्याची वेळ येते. एवढी भयावह स्थिति असताना बोगस मलिदा लाटताना थोडी जणांची नाही पण मनाची तरी ठेवायला हवे असे बोलले जात आहे.

## नेकनूर पोलीसांनी पकडला लाखोंचा गुटखा

कारवाई करण्यात आली. यावेळी एक स्विफ्ट कार ही पोलिसांनी ताब्यात घेतली असून यात २० लाख ७१ हजार ६४० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. याप्रकरणाचा पुढील तपास सुरु असून या कारवाईमुळे गुटखा तस्करांचे धाबे दणाणले आहेत.

# गटविकास अधिकारी यांनी बेकायदेशीर गाव तलाव अतिक्रमण पंचनामा करण्यास सांगितले असून मुसळेकडून टाळाटाळ

## स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे शेख खिजर व जयदेव शिंगने हे जल समाधी आंदोलन करणार

तलवाडा । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील तलवाडा येथे गाव तलाव पाशी मोठ्या प्रमाणात अतिक्रमण करण्यात आले असून बेकायदेशीररित्या जागा हडप करून त्यावर बेकायदेशीर रित्या बांधकाम तसेच बोगस पीटीआर तयार करण्यात आले असून हे अतिक्रमण काढण्यासाठी स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने आयुक्तालय छत्रपती संभाजी नगर, जिल्हाधिकारी बीड, सीईओ बीड, गट विकास अधिकारी गेवराई, तहसीलदार गेवराई यांना निवेदन देण्यात आली असून गेवराई येथील पंचायत समिती गटविकास अधिकारी यांना ग्रामपंचायत तलवाडा येथील ग्राम विकास अधिकारी यांना जागेचा पंचनामा करून अहवाल सादर करण्यासाठी पत्र काढून सांगितले असता वीस दिवस झाले अद्याप तरी अहवाल सादर झालेला नसून कुठे दाळ शिजत आहे, असा प्रश्न सर्वसामान्यांना पडला आहे. गटविकास अधिकारी यांच्या आदेशाला ग्रामविकास अधिकारी मुसळे यांच्याकडून केराची टोपली दाखवण्यात येत असल्याचे दिसून येत आहे.



याबाबत सविस्तर माहिती अशी की, गेवराई तालुक्यातील तलवाडा येथे गाव तलावाचं विषय खूप गाजत असून काही लोकांनी चक्क गाव तलाव संरक्षण भिंत कोरून त्या ठिकाणी आपापल्या पद्धतीने जागा धरून तसेच सदरील जागा महसूलची असताना नियमाबाहेर पी टी आर देण्यात आले असून यामुळे गाव तलावाला धोका निर्माण झाला असून काहींनी तर आड माफ जागा पकडून पक्के घर बांधले असून काहींनी तर बेकायदेशीर धंदे मांडले असून कसलाही परवाना न घेता नियम फक्त गरिबालाच का जो मलिदा देईल त्याची जागा याविषयी चांगली चर्चा रंगू लागली असून स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने गाव तलाव बचाव आंदोलन हाती घेतले असून संबंधित विभागाशी निवेदन दिली असून पत्राची दखल घेत गेवराई येथील गट विकास अधिकारी कांबळे मॅडम यांनी संबंधित गटविकास अधिकारी यांना दि.९/७/२०२५ रोजी पत्र काढले असून त्यामध्ये असा उल्लेख आहे की, संबंधित अतिक्रमण जाग्यावर जाऊन त्याचा पंचनामा करून अहवाल पंचायत समिती येथे सादर करण्यात यावा आज पंधरा दिवस उलटून देखील ग्रामविकास अधिकारी मुसळे यांना वेळ मिळत नसून नेमके दाळ कुठे शिजत आहे असा प्रश्न पडला आहे.

यावेळी स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या जिल्हा उपाध्यक्ष शेख खिजर जैनोदीन यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी सांगितले की, बेकायदेशीर झालेले अतिक्रमण १४ ऑगस्ट पर्यंत न हटवल्यास १५ ऑगस्ट रोजी त्याच तलावात स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे मी व जयदेव शिंगणे हे जलसंबंधी घेणार असून आमच्या जीवितास काही धोका झाल्यास संबंधित विभाग यास कारणीभूत असेल लवकरच निवेदन देणार असून त्यासाठी आंदोलन करण्यात येणार आहे.

# बीड तालुका काँग्रेस पक्षाची कार्यकारणी जाहीर

बीड । प्रतिनिधी

बीड तालुका काँग्रेस कमिटीच्या अध्यक्षपदी नुकतीच फेरनिवड झाल्यानंतर तालुकाध्यक्ष गणेश बजगुडे पाटील यांनी आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकाला सामोरे जाताना काल बीड तालुका काँग्रेसची सर्वसमावेशक व विस्तारीत कार्यकारणी जाहीर केली असुन प्रामाणिक काम करणाऱ्या सर्वसामान्य कार्यकर्त्यांना तालुका कार्यकारणीत संधी दिल्याचे त्यांनी कळवले.



बीड तालुका काँग्रेसच्या उपाध्यक्षपदी शेख कादर बाबामिया इनामदार, श्रीमंत साहेबराव घोडके पाटील, कल्याण लक्ष्मणराव टेकाळे, रवींद्र राजेंद्र गायके सरचिटणीस पदी कृष्णा सोपान साळुंखे, संदीपान पंढरीनाथ पवार, शेख अर्शद मुज्जमिल, काळे अनिल लक्ष्मण, सचिव पदी बाबासाहेब विठ्ठलराव पाटोळे, रमेश प्रतापसिंह ठाकुर, शेख करीम, गोरे नवनाथ यांची तर सोशल मीडिया अध्यक्षपदी झोडगे बालाजी हनुमंतराव यांची निवड करण्यात आली. त्याच बरोबर सदस्य पदी पाली सर्कल प्रमुख योगेश बाबासाहेब बहिरवाळ, नाळवडि सर्कल प्रमुख देवकते भगवान जनार्दन, बहिरवाडी सर्कल प्रमुख संतोष हरीभाऊ घोंगडे, चौसाला सर्कल प्रमुख अशोक मारुती शिंदे, नेकनुर सर्कल प्रमुख सोमनाथ बुवासाहेब शिंदे, लिंबगणेश सर्कल प्रमुख अंकुश सुखदेव घोलप, राजुरी नवगण सर्कल प्रमुख शेख इरफान शेख शफीक, चौरे गोपीनाथ भगवान, शेख इरफान छोटेमियां इनामदार, बेदरे संतोष राम, डोके अनिल, संतोष नवले, घोंगडे अजित, सुशील सोपान मोरे, शेख राजु मुसा, आनंद काशिनाथ पवार आदी पदाधिकाऱ्यांच्या निवडी करण्यात आल्या असुन या सर्व निवडी राज्यसभा खासदार रजनीताई अशोकराव पाटील, माजी मंत्री अशोकराव पाटील साहेब, प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे यांच्या नेतृत्वात करण्यात आल्या असल्याची माहिती तालुकाध्यक्ष गणेश बजगुडे पाटील यांनी कळवले आहे.

# मदनलाल सारडा राजस्थानी प्राथमिक विद्यालयात माता पालक व पालक शिक्षक संघाची स्थापना

बीड । प्रतिनिधी

पेठ बीड मधील राजस्थानी सेवा समाज संचलित मदनलाल सारडा राजस्थानी प्राथमिक विद्यालयात माता पालक व पालक शिक्षक संघाची स्थापना व बैठक संपन्न झाली या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक सोहनी सर तर प्रमुख पाहुणे म्हणून श्री महेश लड्ढा व श्री गोविंद फावडे उपस्थित होते. व माता पालकातून सौ संगीता ताई शिंदे या होत्या. कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती पूजनाने झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शिराळकर सर यांनी केले प्रस्ताविकात त्यांनी माता पालक व पिता पालक संघाची आवश्यकता शाळेत का असते याचे प्रतिपादन केले.



शाळेत चालणाऱ्या विविध विभागांची माहिती माता पालक व पिता पालकांना व्हावी यासाठी सर्व प्रथम श्री.लड्ढा सर यांनी सांस्कृतिक विभागा मार्फत शाळेत घेतले जाणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली त्यामध्ये शाळा प्रवेशोत्सव तसेच पेठ बीड मधील आकर्षक अशी बाल दिंडी कशी साजरी केली हे यावेळी पालकांना सांगितले तसेच शाळेत झालेल्या जयंती पुण्यतिथी यांची माहिती दिली. तसेच आगामी काळात सांस्कृतिक विभाग कोणते कोणते कार्यक्रम घेणार आहे याची सविस्तर रूपरेषा सादर केली.

तसेच कब बुलबुल पथकाचे कार्य तसेच शाळेतील ढोल व लेझीम पथक याची सविस्तर माहिती यावेळी सांगण्यात आली. यानंतर श्रीदोडे सर यांनी ऍडमिशन प्रोसेस तसेच परीक्षा सेतू चाचणी व प्रथम मूल्यांकन चाचणी याविषयी पालकांना सविस्तर माहिती दिली. श्री तंबरे सर यांनी शालेय शिस्त तसेच आगामी काळात जाणाऱ्या परिसर सहली संदर्भात माहिती यावेळी विषद केली. सौ.जाधव मॅडम यांनी शाळेतून भरल्या जाणाऱ्या विविध शिष्यवृत्ती योजनांची माहिती सांगितली त्यामध्ये अस्वच्छ व्यवसाय शिष्यवृत्ती, अपंग शिष्यवृत्ती, सुवर्ण महोत्सवी आदिवासी शिष्यवृत्ती योजना माहिती सांगितली. अध्यक्ष समारोप करताना मुख्याध्यापक सोहनी सर म्हणाले की, शाळेच्या जडणघडणी साठी माता पालक व पालक शिक्षक संघाची स्थापना करणे गरजेचे असते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विभाग प्रमुख सौ बियाळे मॅडम केले तर आभार प्रदर्शन सौ तौर मॅडम यांनी मानले. यावेळी पालक प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक-शिक्षिका शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# लिंबागणेश येथे राज्यव्यापी चक्काजाम आंदोलनाला उत्स्फूर्त प्रतिसाद

लिंबागणेश । प्रतिनिधी

माजी राज्यमंत्री तथा प्रहार जनशक्ती पक्ष चे संस्थापक अध्यक्ष ओमप्रकाश (बच्चू) कडु यांनी मांडलेल्या शेतकरी कर्जमाफी, शेतीमालाला हमीभावावर २० टक्के प्रोत्साहन बोनस, कामगार, दिव्यांग व विधवा महिलांना मासिक ६००० रुपये मानधन, तसेच रोजगार, शिक्षण व आरोग्य या मूलभूत मुद्द्यांवर तातडीने निर्णय घ्यावेत या मागण्यांसाठी पुकारलेल्या राज्यव्यापी चक्का जाम आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी लिंबागणेश येथेही आंदोलन करण्यात आले.

आज गुरुवार, दि.२४ रोजी सकाळी अहमदपूर-अहिल्यानगर राष्ट्रीय महामार्गावरील छत्रपती शिवाजी महाराज चौकात सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन सुरू झाले. यावेळी सरकारविरोधात घोषणाबाजी करण्यात आली. या आंदोलनात सेवा सोसायटीचे चेअरमन रविंद्र निर्मळ, शिवशक्ती भिमशक्ती विचारमंच प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब मोरे पाटील यांची समायोजित भाषणे झाली.



यावेळी नेकनूर पोलिस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक आप्पासाहेब रोकडे यांना मागण्यांचे निवेदन देण्यात आले. लिंबागणेश पोलिस चौकीचे सहाय्यक फौजदार बाबासाहेब राख, पो.शि. बाबासाहेब खाडे, विशाल कदम, पो.हे. अनिल राऊत हे देखील उपस्थित होते. आंदोलनात सरपंच बालासाहेब जाधव, राजेभाऊ आप्पा गिरे, बाळकृष्ण थोरात, विक्रांत वाणी, सुरेश निर्मळ, संजय घोलप, अभिजित गायकवाड, सय्यद अख्तर, दादा गायकवाड, अंकुश वाणी, भगवान मोरे, भालचंद्र गिरे, तुळशीराम वनवे, गणपत घोलप, प्रकाश ढवळे, धनंजय बागल, दादाराव घाडगे, विशाल वाणी, प्रकाश निर्मळ, संदिप निर्मळ, अजय थोरात आदींचा उत्स्फूर्त सहभाग होता.

# जिल्हा परिषद उर्दू प्राथमिक शाळेत विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप

सिरसाळा । प्रतिनिधी

तुळजाभवानी नागरी सहकारी पतसंस्था तर्फे जिल्हा परिषद उर्दू शाळेतील इयत्ता पहिलीचे एकूण ४० विद्यार्थ्यांना उत्तम दर्जाचे स्कूल बॅग पतसंस्थेतर्फे देण्यात आले. स्कूल बॅग वितरणाच्या छोटा खानी कार्यक्रम शाळेत आयोजित करण्यात आला होता.



याप्रसंगी बोलताना पसंस्थेचे शाखा मॅनेजर शेजुडे यांनी पतसंस्थेविषयी बोलताना सांगितले की, पतसंस्थेच्या हेतू फक्त पैशाची देवाणघेवाण नाही तर या पतसंस्थेकडून समाजामध्ये चांगला बदल यावे व या पैशाच्या माध्यमातून गोरगरिबांचे मुले पुढे उच्च शिक्षण घ्यावे यासाठी पतसंस्था सदैव प्रयत्नशील असते शाळेचे मुख्याध्यापक पठाण सर यांनी पतसंस्थेचे आभार मानले आणि त्यांचे कार्याचे कौतुक केले. या कार्यक्रमात शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष मौलाना अख्तर मिल्ली शालेय समीतीचे अपध्यक्ष पठाण आसिफ, केंद्रप्रमुख वैजनाथ मुंडे, पत्रकार रफिक पठाण, बापू किरवले, सामाजिक कार्यकर्ते सय्यद अयुब, शाळेच्या शिक्षिका तनवीर बाजी, ताहेरा बाजी, झिनत बाजी व पतसंस्था चे कर्मचारी मोठ्या संख्येने पालक वर्ग शिक्षक व विद्यार्थी कार्क्रमास मोठ्या संखेने उपस्थित होते. तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शेख साबेर यांनी उत्तमरीत्या पार पाडले.

# ज्ञानदीप बालसंस्कार केंद्रात ग्रीन डे उत्साहात साजरा

धारूर । प्रतिनिधी

ज्ञानदीप बालसंस्कार केंद्र, किल्ले धारूर येथे वनसंवर्धन दिनानिमित्त ग्रीन डे मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या उपक्रमात शिशुगट व बालवाडीतील बालचिमुकल्यांनी हिरवे वस्त्र परिधान करून व आपल्या आहारात हिरव्या पालेभाज्या व फळांचा समावेश करून पर्यावरण संवर्धनाचे महत्व अधोरेखित केले.



या उपक्रमात मुलांनी वेगवेगळ्या झाडांची पाने, फुले, फळे यांची ओळख करून घेतली व तसे सादरीकरण केले. विशेष आकर्षण ठरली ती वनसंवर्धनावर आधारित मुक्त नाटिका, ज्यामध्ये सेव ट्री, सेव वॉटर, सेव लाइफ, झाडे लावा, झाडे जगवा यासारखे प्रभावी संदेश देण्यात आले. छोट्या चिमुकल्यांच्या अभिनयातून पर्यावरणाबद्दलची जाणीव अधिक ठळक झाली. याचबरोबर, सर्व विद्यार्थ्यांनी विद्यालयाच्या परिसरात १० रोपटे लावून त्याच्या संवर्धनाची जबाबदारी घेण्याचा संकल्प केला. यामुळे लहान वयातच निसर्ग संवर्धनाचे संस्कार रुजले जात असल्याचे दृश्य पाहायला मिळाले. तसेच आज ग्रीन डेनिमित्त विद्यार्थ्यांनी आपल्या आहारामध्ये हिरव्या पालेभाज्या व फळभाज्या टिफीनमध्ये खाण्यासाठी आणल्या होत्या. यामध्ये भेंडी, मेथी, काकडी, पालक, शेपू इतर असे अनेक पदार्थ आणून त्याचाही आस्वाद घेतला.

या उपक्रमाचे यशस्वी आयोजन शैला महाजन मॅडम, सुरेखा वाकूडे मॅडम, रोहिणी पटाईत मॅडम, नीत्के मॅडम व लोखंडे मॅडम यांच्या परिश्रमातून आणि अथक मेहनतीमुळे शक्य झाले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम सुरळीत पार पडला. ग्रीन डेचे मुख्य उद्दिष्ट पर्यावरण संरक्षणासोबतच आरोग्यदायी जीवनशैली व सामाजिक जबाबदारी या बाबत विद्यार्थ्यांमध्ये जागरुकता निर्माण करणे हे होते, जे या कार्यक्रमातून साध्य झाले. कार्यक्रमाच्या शेवटी प्रत्येकाने झाडे लावण्याचे व जपण्याचे व्रत घेतले आणि हिरवळ टिकवण्यासाठी शपथ घेतली.

## जमियतुल कुरेशी समाजाने महाराष्ट्रमध्ये पशु खरेदी-विक्री बंद पुकारले

# कुरेशी समाजाचा एल्गार बायकॉट आंदोलन

माजलगाव । प्रतिनिधी

कुरेशी समाजाने महाराष्ट्र मध्ये पुकारलेले पशु खरेदी-विक्री बंद आंदोलन हा केवळ एक व्यवसाय थांबवण्याचा निर्णय नाही, तर त्यांच्यावर होणाऱ्या अमानुष हल्ल्यांविरुद्ध, खोट्या आणि मनमानी केसेसविरुद्ध, तसेच वर्षानुवर्षे सुरू असलेल्या घोर अन्यायाविरुद्ध पुकारलेला हा एक प्रखर आणि निर्णायक लढा आहे. हा 'बायकॉट' केवळ तात्पुरता बंद नसून, आपल्या हक्कांसाठी आणि सन्मानासाठी दिलेला हा एक अस्तित्वाचा लढा आहे, जो आता अधिक तीव्र आणि प्रभावीपणे लढला जाईल!

अन्यायाची परिसीमा: सहनशीलतेचा अंत!

गेली अनेक वर्षे कुरेशी समाज शांतताप्रियपणे आपला पारंपरिक पशुधन व्यवसायात कार्यरत आहे. मात्र, 'गोरक्षणा'च्या नावाखाली काही समाजकंटकांकडून त्यांच्यावर होणारे अमानुष हल्ले, जीवघेणी मारहाण आणि वाहनांची जाळपोळ हे आता नित्याचे झाले आहे. इतकेच नाही, तर त्यांना कायद्याच्या कचाट्यात ओढण्यासाठी बिनबुडाचे आणि खोटे गुन्हे दाखल केले जात आहेत. यामुळे त्यांचे जीवन आणि उपजीविका दोन्ही धोक्यात आले आहे. कुटुंबाचे पोट भरणेही मुश्कील झाले आहे. या अन्यायाने आता सहनशीलतेचा अंत झाला आहे. कुरेशी समाज आता या अन्यायाविरुद्ध एकजुटीने उभा राहिला आहे!





**'बायकॉट'ची वज्रमुठ: व्यवस्थेला हादरवणारी शक्ती!**

हा 'बायकॉट' म्हणजे केवळ एक व्यावसायिक निर्णय नाही, तर तो व्यवस्थेला हादरवून सोडण्याची वज्रमुठ आहे. जेव्हा हजारो वर्षांचा पारंपरिक व्यवसाय करणारा एक मोठा समाज आपले काम थांबवतो, तेव्हा त्याचे दूरगामी आणि गंभीर परिणाम होतात. अर्थव्यवस्थेवर थेट आघात: पशुधन खरेदी-विक्री, मांस उद्योग आणि यावर अवलंबून असलेले हजारो कोटींचे व्यवहार ठप्प होतील. राज्याच्या आणि देशाच्या अर्थव्यवस्थेवर याचा गंभीर परिणाम होईल, ज्यांची दखल शासनाला घेणे भाग पडेल. दडपशाहीला सडेतोड उत्तर: खोट्या गुन्हे आणि हल्ल्यांनी दडपण्याचा प्रयत्न करणाऱ्यांना यातून सडेतोड उत्तर मिळेल. कुरेशी समाज आता दडपशाहीपुढे झुकणार नाही, हा स्पष्ट संदेश यातून जाईल. सामाजिक आणि राजकीय दबाव: या आंदोलनाची धग समाजाच्या प्रत्येक स्तरावर पोहोचेल. राजकीय नेते आणि प्रशासनाला याची दखल घेणे अपरिहार्य होईल. शांतता आणि सुव्यवस्था राखण्यासाठी तसेच नागरिकांच्या मूलभूत हक्कांचे संरक्षण करण्यासाठी त्यांना तातडीने कठोर उपाययोजना कराव्या लागतील. आत्मसन्मानाची मशाल: हा 'बायकॉट' म्हणजे आत्मसन्मानाची मशाल आहे. आपल्या हक्कांसाठी, आपल्या सुरक्षिततेसाठी आणि न्यायासाठी लढण्याची प्रेरणा यातून मिळेल. हा लढा केवळ कुरेशी समाजाचा नाही, तर हा न्याय आणि समानतेच्या तत्त्वांचा लढा आहे.

आता निर्णायक लढ्याची वेळ!

कुरेशी समाजाचे हे आंदोलन आता केवळ व्यवसाय बंद ठेवण्यापुरते मर्यादित राहणार नाही, तर ते न्याय मिळेपर्यंत आणि अन्यायाची पाळेमुळे समूळ उपटून टाकेपर्यंत सुरू राहील. प्रत्येक हल्लेखोर आणि खोटे गुन्हे दाखल करणाऱ्यांवर कठोर कारवाई झालीच पाहिजे. कुरेशी समाजाला सन्मानाने, निर्भयपणे आणि सुरक्षितपणे आपला व्यवसाय करण्याचा कायदेशीर अधिकार मिळालाच पाहिजे. हा 'बायकॉट' म्हणजे कुरेशी समाजाच्या सामूहिक शक्तीचे आणि त्यांच्या अदम्य धैर्याचे प्रतीक आहे. हा लढा केवळ कुरेशी समाजाला न्याय मिळवून देईल असे नाही, तर तो देशातील कोणत्याही वंचित आणि अन्यायग्रस्त समाजासाठी प्रेरणास्रोत बनेल. आता वेळ आहे अन्यायाविरुद्ध एल्गार पुकारण्याची, आपल्या हक्कांसाठी लढण्याच वेळ आली आहे याची प्रशासनने लक्ष देऊन त्याच्या मागण्या मान्य करावा अशी मागणी करित आहे.



सोनपेठ येथील वंसतराव नाईक मंगल कार्यालय येथे मंगल परिणयासाठी मुंढे व भुजबळ या विवाह सोहळ्यासाठी पि.आर.पी.चे मराठवाडा अध्यक्ष गौतम मुंढे यांच्या पुतणीच्या व उत्तमजी मुंढे यांच्या मुलीच्या मंगल परिणयास उपस्थित राहून मान्यवर सोनपेठ नगरी चे मा.नगराध्यक्ष चंद्रकांतजी राठोड व मा. उपाधक्ष दतारावजी काका कदम, सिरसाळा नगरीचे मा.सरपंच राम दादा किरवले, प्रा.दयानंद झुंजुर्डे सर, बाळासाहेब किरवले, नगरसेवक शरद बनसोडे, अच्युत किरवले, संभाजी आरसुळे, समाज सेवक मारोती रंजवे या मंगल सोहळ्यासाठी भिम शाहीर गायका मंजुषा शिंदे व शाहीर सुरेश रंजवे सोनपेठ यांचा संच या वेळी उपस्थित होता. यावेळी दैनिक आरंभ चे परळी तालुका प्रतिनिधी बापु किरवले उपस्थित होते.

## कोरोना काळात मराठा आरक्षण प्रश्नावर काढण्यात आला होता मोर्चा

# सुरेश धस यांची गुन्ह्यातून निर्दोष मुक्तता

आष्टी । प्रतिनिधी

कोविड-१९ या साथ रोगाच्या प्रादुर्भाव कालावधीमध्ये जमावबंदी प्रतिबंधक कायदा लागू करण्यात आलेला असताना बीड येथे जिल्हाधिकारी कार्यालयावर आ. सुरेश धस यांच्या नेतृत्वाखाली मोर्चाचे आयोजन करून प्रतिबंधात्मक कायदा भंग केल्याच्या आरोपावरून आ.सुरेश धस आणि इतरांवर गुन्हा दाखल करण्यात आला होता त्याचा आज न्याय निर्णय होऊन आ.सुरेश धस यांचे सह सर्वांची निर्दोष मुक्तता करण्यात आली आहे.

याविषयीचे सविस्तर वृत्त असे की, मराठा समाजाला आरक्षण मिळावे या मागणीसाठी आमदार सुरेश धस यांनी यांनी बीड जिल्हाधिकारी कार्यालयावर कार्यालयावर लाखोंच्या संख्येने मोर्चा आयोजित केला होता तात्कालीन महाविकास आघाडी सरकारच्या काळात कोविड-१९ चे निमित्त समोर करून प्रतिबंधात्मक कायदा भंग केल्याचे दाखवून आमदार सुरेश धस आणि इतरांवर गुन्हा दाखल करण्यात आला होता.

वास्तविक पाहता हा मराठा समाज आरक्षण विषयी असलेल्या सामाजिक मागणीसाठी लाखोंच्या उपस्थितीत बीड जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात होता हा मोर्चा समाजहित डोळ्यासमोर ठेऊन हा मोर्चा काढण्यात आला होता. मराठा आरक्षणासाठी शासनाच्या विरोधात मोर्चा काढला म्हणून आमदार सुरेश धस आणि इतर संयोजक यांचे विरुद्ध कलम १८८,२७९,२८० भादवि सह कलम ५१(ब) तसेच आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ सह कलम २,३,४ साथीचे रोग कायदा प्रमाणे गुन्हा दाखल केला. आ.सुरेश धस यांच्यासह पाटोदा नगराध्यक्ष राजू जाधव, लोकनेते गोपीनाथरावजी ऊस तोड कामगार संघटनेचे प्रदेशाध्यक्ष सुखदेव अप्पा सानप, जि.प सदस्य माऊली जरांगे, युवा नेते सचिन उबाळे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सोशल फोरमचे प्रदेशाध्यक्ष यशवंत खंडागळे, शेख वसीम, लोकनेते गोपीनाथरावजी ऊसतोड कामगार संघटनेचे प्रदेश प्रवक्ते अभिजीत शेंडगे माजी जिल्हा परिषद अध्यक्ष मीरा गांधले यांच्यावर हा खटला दाखल करण्यात आला होता. दि.२३ जुलै रोजी बीड न्यायालयाने आमदार सुरेश धस यांच्यासह मा.आ. लक्ष्मण पवार, मा.आ.आर.टी.देशमुख, राजेंद्र जाधव, भारत जगताप यांचीही निर्दोष मुक्तता करण्यात आली आहे.



आमदार सुरेश धस हे समाजासाठी अहोरात्र कार्य करणारे लोकप्रतिनिधी आहेत. आतापर्यंत मराठा आरक्षण प्रश्नासाठी शासन दरबारी प्रयत्न केले आहेत. मराठा आरक्षणासाठी विधानसभेपासून रस्त्यावरच्या लढाई मध्ये सतत समाजासोबत शासनाकडे लढाई लढत आहेत. अशा प्रकारचे चार-पाच खटले त्यांच्यावर आष्टी न्यायालयात देखील दाखल झाले होते त्यात देखील ते निर्दोष सुटले आहेत अशा प्रकारचे त्यांच्यावर खटले दाखल झाले तरीही समाजकार्याचा वसा आणि वारसा त्यांनी जोपासला आहे. या खटल्यामध्ये आमदार सुरेश धस आणि इतरांच्या बाजूने ॲड.नामदेव साबळे आणि ॲड. दिनेश हंगे आणि सहकाऱ्यांनी काम पाहिले. याप्रसंगी न्यायालयामध्ये उपस्थित वकील बांधवांनी त्यांचे अभिनंदन केले.

> बीड जिल्हा न्यायालय आणि जिल्हाधिकारी कार्यालय या ठिकाणी रस्त्यावर डिव्हायडर बसवण्यात यावे अशा मागणीचे निवेदन आ. सुरेश धस यांचे देण्यात आले
>
> **– ॲड. यासीर पटेल**
> सचिव, वकील संघ
> बीड जिल्हा न्यायालय
>
> आ.सुरेश धस हे सतत सामाजिक न्यायासाठी सतत संघर्ष करत असतात मराठा समाजास आरक्षण मिळावे यासाठी आयोजित केलेल्या मोर्चामुळे त्यांचे वर खटला दाखल झाला होता या खटल्यामध्ये ज्यांची निर्दोष मुक्तता झाल्याबद्दल मी त्यांचे सकल मराठा समाजाच्या वतीने मनापासून अभिनंदन करतो.
>
> **– ॲड. रोहिदास येवले**
> अध्यक्ष, वकील संघ
> बीड जिल्हा न्यायालय

## विना रॉयल्टी ५००० रुपये ब्रासच्या सँड क्रशरच्या लुटीला हफ्ते घेणारे तहसीलदार जबाबदार

### अवैध गौण खनिज माफियांचा दरोडा; जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, कारवाई करा!

गेवराई । प्रतिनिधी

जिल्ह्यात क्रशर मालकांनी सर्व मर्यादा ओलांडल्या असून, सामान्य जनतेची लूट थांबण्याचे नाव घेत नाही. सँड क्रशरचा भाव ५००० रुपये प्रति ब्रासपर्यंत गेला असून, विना रॉयल्टी अवैध गौण खनिजाची सर्रास विक्री सुरू आहे. यामुळे शासनाचा महसूल बुडत असून, सामान्य नागरिकांना आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे. विशेष म्हणजे, तहसीलदार आणि गौण खनिज विभागाचे अधिकारी हफ्ते घेऊन या अवैध धंद्याला खतपाणी घालत असल्याचा गंभीर आरोप होत आहे.

अवैध वाळू वाहतूक आणि विना रॉयल्टी खडी, मुरूम, सँड क्रशरच्या वाहतुकीत फरक काय, असा प्रश्न जनतेला पडला आहे. वाळू वाहतूक बेकायदेशीरपणे नदीपात्रातून केली जाते, तर खडी-मुरूम-सँड क्रशरच्या नावाखाली क्रशर मालक विना परवाना खनिजांचा उपसा आणि विक्री करतात. दोन्ही प्रकरणांमध्ये तहसीलदारांचा हस्तक्षेप अपेक्षित आहे, परंतु हफ्त्याच्या मोहापायी कारवाई होत नसल्याने जनता संतप्त आहे.जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी या भ्रष्टाचाराच्या जाळ्यावर तातडीने कारवाई करावी, अशी मागणी जोर धरू लागली आहे. अवैध खनिज वाहतूक करणाऱ्या वाहनांवर जप्ती आणि दंडाची कठोर कारवाई, तसेच भ्रष्ट तहसीलदार आणि गौण खनिज विभागाच्या अधिकाऱ्यांचे निलंबन आवश्यक आहे. शासनाच्या नवीन वाळू धोरणानुसार, अवैध वाहतुकीवर १ लाख रुपये दंड आणि शिक्षेची तरतूद आहे. तरीही, तहसीलदारांचे मौन आणि निष्क्रियता जनतेच्या जखमेवर मीठ चोळत आहे.



> जिल्हाधिकारी साहेब, आता जागे व्हा! भ्रष्ट अधिकाऱ्यांना पाठीशी घालणाऱ्या माफियांना चाप लावा. सामान्य जनतेच्या हितासाठी तात्काळ चौकशी करून कठोर कारवाई करा, अन्यथा जनआंदोलन अटळ आहे असे नागरिकांनी सांगितले आहे.

## ग्राहक सेवा केंद्रातील कर्मचाऱ्याने हडपली सहा लाखांची रक्कम; गुन्हा दाखल

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई शहरातील एका नामांकित ग्राहक सेवा केंद्रातून कामावर असलेल्या कर्मचाऱ्याने मालकाचा विश्वासघात करत तब्बल ६ लाख ८ हजार ६०० रुपयांचा आर्थिक अपहार केल्याची गंभीर घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात त्या कर्मचाऱ्यावर फरावणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

शरद आश्रुबा चव्हाण (रा. मोरेवाडी, ता. अंबाजोगाई) यांचे यशराज ई-सर्व्हिसेस नावाचे ग्राहक सेवा केंद्र नगर परिषद इमारतीत कार्यरत आहे. त्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, बँकिंग सेवा पुरवणाऱ्या या केंद्रात बँक व्यवहाराचे कामकाज पाहण्यासाठी किरण काशीनाथ जोगदंड याला गेल्या चार वर्षांपासून नोकरीवर ठेवले होते. चव्हाण हे निवडणुकीच्या कामासाठी वारंवार बाहेरगावी जात असल्याने आर्थिक व्यवहाराचा संपूर्ण अधिकार किरणकडे सोपवण्यात आला होता. मार्च २०२५ मध्ये खात्याच्या तपासणीदरम्यान त्यामध्ये मोठी आर्थिक ग्राहक सेवा केंद्र त्रीतफावत असल्याचे शरद चव्हाण यांच्या लक्षात आले. त्यांनतर त्यांनी ग्राहक सेवा केंद्रामार्फत झालेल्या सर्व व्यवहारांची चौकशी सुरू केली. सीसीटीव्ही फुटेज व बँक स्टेटमेंट तपासल्यानंतर हे उघड झाले की, जवळपास मागील तीन वर्षांच्या कालावधीत किरण जोगदंड याने मित्र शुभम जोगदंड, बहीण पूजा जोगदंड,पत्नी वैष्णवी जोगदंड आणि मित्र सुनिल पाटोळे यांच्या खात्यावर विविध तारखांना रक्कम जमा करून ती परत स्वत:कडे घेतली होती. बँक ऑफ इंडियाच्या शाखेतील व एयरटेल पेमेंट बँकेच्या खात्यांमधून किरण जोगदंड याने तब्बल साडेसहा लाख रुपयांचा अपहार केला असून, संबंधित रक्कम फरावणुकीने हस्तांतरित करण्यात आल्याचे निष्पन्न झाले. इतकेच नव्हे तर इतर खात्यांवरही पैसे पाठवले असल्याची शक्यता आहे.




हेतुपुरस्सर किरण याने विश्वासघात करून स्वत:च्या नातेवाईकांच्या मदतीने रक्कम परस्पर ट्रान्सफर करून फसवणूक केली असल्याचे शरद चव्हाण यांनी फिर्यादीत नमूद केले आहे. सदरील फिर्यादीवरून किरण जोगदंड याच्या विरुद्ध अंबाजोगाई शहर ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा नोंदवण्यात आला. पुढील तपास संबंधित तक्रारीनंतर अंबाजोगाई शहर पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून, पुढील तपास पोलीस उप निरिक्षक ज्ञानेश्वर कांबळे करत आहेत.

## प्रहारचा शेतकरी कर्जमाफी व इतर मागण्यासाठी धारूर छ.शिवाजी महाराज चौक येथे रस्ता रोको

धारूर । प्रतिनिधी

खामगाव पंढरपूर राष्ट्रीय महामार्गावर किल्ले धारूर येथील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे शेतकरी कर्जमाफी व ईतर सात मागण्यासाठी चक्काजाम आंदोलन करण्यात आले. हा रस्ता रोको २४ जुलै रोजी गुरूवारी सकाळी अर्धा तास रस्ता रोको करण्यात आला. यावेळी आझाद क्रांती सेना तालुकाप्रमुख बळीराम मस्के यांनी या चक्काजाम आंदोलनाला पाठिंबा दिला. यावेळी प्रहार जनशक्ति पक्ष तालुका अध्यक्ष हनुमंत तोंडे यांनी या रस्ता रोकोचे निवेदन दिले होते.

प्रहार जनशक्ती पक्ष महाराष्ट्र राज्य संस्थापक अध्यक्ष बच्चुभाऊ कडू यांच्या नेतृत्वात महाराष्ट्रभर शेतकरी कर्जमाफी व शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नाबाबत सर्व महाराष्ट्रभर चक्काजाम आंदोलन करण्याचे आदेश दिले होते.



दि.२४/०७/२०२५ रोजी किल्ले धारूर तालुका प्रहारच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज चौक या ठिकाणी हनुमंत तोंडे यांच्या नेतृत्वात चक्काजाम आंदोलन करण्यात आले. यावेळी प्रहारचे विष्णु चोले, बापू सिरसठ आदी उपस्थीत होते. यामध्ये रस्ता रोकोस सुरुवात करण्यात आली. यावेळी वाहतूक ठप्प झाली होती. अर्धा तास हा रस्ता रोको करण्यात आला. यावेळी आझाद क्रांती सेना संघटना धारूर तालुक्याच्या वतीने तालुकाप्रमुख बळीराम मस्के, किशोर अंडिल, धर्मा हजारे, मनोज कांबळे, मनोहर इचके, अशोक वाघमारे, अभिजीत घोडे यांच्यासह आझाद क्रांती सेनेच्या संघटनेमार्फत या रस्ता रोकोस पाठिंबा दिला व अंदोलनात सहभागी झाले या रस्ता रोको करण्यामागे शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करून शेतकरी कर्ज माफी झाली पाहिजे, जन सुरक्षा विधेयक रद्द करण्यात यावा, ५८ वर्षावरील सर्व शेतकरी शेतमजूर कामगार दिव्यांग यांना सहा हजार रुपये मासिक पेन्शन देण्यात यावी, शेतकऱ्यांना २४ तास व मोफत विद्युत पुरवठा करण्यात यावा, शेतकऱ्यांच्या मालाला हमी भाव देण्यात यावा या मागण्या संदर्भात हा रस्ता रोको प्रहारच्या वतीने सर्व महाराष्ट्रभर चक्काजाम आंदोलन करण्यात आले.

## नशेच्या गोळ्या विक्री प्रकरण; मेडिकल चालकाससह दोघांस अटक

बीड । प्रतिनिधी

नशेसाठी गोळ्या व औषधांची विक्री करणाऱ्या दोन जणांना बीड शहर पोलिसांनी तपसात अटक केली. अटक करण्यात आलेल्यांमध्ये मेडिकल चालक व त्याला पुरवठा करणारा तरुण यांचा समावेश आहे.

पोलिस अधीक्षक श्री नवनीत कॉंवत यांनी नशाखोरी आणि त्यापाठीमागील गुन्हेगार यावर कडक कारवाई करण्याच्या सूचना केलेल्या आहेत. बीड शहर पोलिसांनी दोन महिन्यांपूर्वी नशेच्या गोळ्या विक्री करणाऱ्या रॅकेटचा पर्दाफाश केला होता. या प्रकरणात चार जणांना तेव्हा अटक केली होती. त्यांच्याकडून अल्प्राझोलम गोळ्या आणि कोडीन सायरपसह एकूण सुमारे साडेतीन लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला होता. या प्रकरणी अंमली पदार्थ विरोधी कायद्यानुसार गुन्हा नोंद केला होता. सध्या हे चारही आरोपी कारागृहात आहेत. या प्रकरणाच्या तपासात पोलिसांना शेख फारुक शेख आरेफ (रा. इस्मालमपूरा, बीड) या मेडिकल चालकाने या गोळ्यांची विक्री केल्याचे समोर आले होते. त्याला पोलिसांनी अटक केली त्याच्या चौकशीत त्याला इनामदार मोहम्मद तारीखोद्दीन मोहम्मद नुरुद्दीन (रा. शहेंशाहर नगर) या गोळ्या पुरवठा केल्याचे समोर आले. त्यालाही पोलिसांनी अटक केली. त्यामुळे या प्रकरणातील एकूण आरोपींची संख्या ६ झाली आहे.



सदरील कामगिरी पोलिस अधीक्षक नवनीत कॉंवत, अपर पोलिस अधीक्षक सचिन पांडकर, यांचे मार्गदर्शन प्रमाणे पोलिस निरीक्षक शीतलकुमार बल्लाळ, सपोनी बाबा राठोड, पोलिस अंमलदार सचिन अलगट, संजय राठोड, गहिनीनाथ बावनकर, राम पवार यांनी केली आहे. या प्रकरणी बीड शहर पोलिस अधिक तपास करत आहेत.

## बच्चू कडूंच्या नेतृत्वाखाली बीड परळी हायवेवर रास्ता रोको

दिंदुड । प्रतिनिधी

वंदनी बच्चुभाऊ कडू यांच्या नेतृत्वाखाली बीड परळी हवे दिंद्रुड येथे भव्य चक्काजाम आंदोलन करण्यात आले. सात बारा कोरा करण्यात यावा दिव्यांगांना सहा हजार रुपये महिना देण्यात यावा अशा विविध मागण्या संदर्भात शेतकरी बांधव बच्चू भाऊ वर प्रेम करणारे युवक संघटना उपस्थित होते. दिंद्रुड येथे रस्ता रोको करण्यात आला दोन किलोमीटर वाहनाचे रांगा झाले होते.



आंदोलनाचे यशस्वी करण्यासाठी माजलगाव तालुका अध्यक्ष रमेश चव्हाण तालुका उपाध्यक्ष, विकास काटकर, गावचे माजी उपसरपंच नानासाहेब ठोंबरे, युवराज बापू ठोंबरे, मुन्ना ठोंबरे, संजय शिंदे यांनी या आंदोलनाला भव्य दिव्य स्वरूप देऊन व मार्गदर्शन करून व सर्व गावकरी शेतकरी बंधू उपस्थित होते. अधिकारी दिंद्रुड पोलीस स्टेशनचे कर्तव्यदक्ष अधिकारी एपीआय ढाकणे व पीएसआय राठोड यांनी निवेदन स्वीकारले व चौक बंदोबस्त केले.

## पशुधन गमावलेल्या शेतकऱ्याला गणेश लांडे यांच्याकडून ११ हजार रुपयांची आर्थिक मदत

बीड । प्रतिनिधी

बाबुळवाडी (ता. बीड) येथील शेतकरी शहादेव पाटील सातपुते यांचा बैल अलीकडेच मृत्यूमुखी पडला. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांसाठी बैल म्हणजे केवळ शेतीचे साधन नाही, तर त्याचा दैनंदिन जीवनाशी असलेला भावनिक व आर्थिक संबंध अतूट असतो. अशा वेळी पशुधन गमावणे हे शेतकऱ्यांसाठी मोठं संकट ठरतं. ही बाब समजताच नामदार पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त जनसेवा हीच खरी शुभेच्छा या भावनेतून गणेश लांडे यांनी पुढाकार घेत शहादेव सातपुते यांना ११,००० रुपयांची आर्थिक मदत केली.

या सांत्वन प्रसंगी भाजप नेते दुशांत नाना डोंगरे, आप्पा नागरगोजे, तसेच पुरुषोत्तम डोईफोडे, जनार्दन लांडे, शांतीराम आप्पा सातपुते, राधाकिसन सातपुते, सर्जेराव सातपुते आणि राहुल भट्टे यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



पंकजाताई मुंडे या आपल्या कार्यक्षम नेतृत्वासाठी, कणखर भूमिका व समाजाभिमुख दृष्टिकोनासाठी राज्यभरात ओळखल्या जातात. त्यांचा वाढदिवस दरवर्षी केवळ औपचारिकतेपुरता न साजरा होता, तर सेवा उपक्रमांच्या माध्यमातून समाजात सकारात्मक बदल घडवण्याचा एक प्रयत्न असतो. वृक्षारोपण, रक्तदान, शैक्षणिक मदत, आरोग्य शिबिरे आणि अशा प्रकारच्या गरजूंना मदतीचा हात देणाऱ्या कृती हीच त्यांची कार्यपद्धती आहे.

गणेश लांडे यांनी घेतलेली पुढाकाराची ही भूमिका पंकजाताईंच्या विचारांचीच प्रात्यक्षिक रूपात सादर करणारी ठरली आहे. शब्द नाही, कृतीतून सेवा ही संकल्पना यामध्ये ठळकपणे दिसून आली आहे. शेतकऱ्यांच्या वेदनेत सहभागी होणं, त्यांना वेळेवर आधार देणं हेच खऱ्या अर्थाने लोकसेवा आणि नेतृत्वाचं लक्षण आहे, हे गणेश लांडे यांनी आपल्या वागणुकीतून दाखवून दिलं आहे.

## राष्ट्रीय महामार्ग भूसंपादनात उपविभागीय अधिकारी विकास माने यांनी केला १६ कोटींचा अपहार? : वंचित बहुजन आघाडीची तक्रार

बीड । प्रतिनिधी

धुळे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गासाठी बीड जिल्ह्यात करण्यात आलेल्या भूसंपादन प्रक्रियेत १६ कोटी ३६ लाख रुपयांचा शासकीय निधी अपहार झाल्याचा आरोप वंचित बहुजन आघाडीने केला आहे. वंचित बहुजन आघाडीचे बीड जिल्हाध्यक्ष प्रतिक उर्फ अजय सरवदे यांनी महसूल व वन विभाग, विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी व राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडे तक्रार सादर केली असून, तत्कालीन उपविभागीय अधिकारी विकास माने यांच्यावर गंभीर आरोप करण्यात आले आहेत.

तक्रारीनुसार, गेवराई, बीड, चौसाळ आणि धोत्रा या गावांमधील अकृषिक आदेशांच्या मूळ नोंदी अभिलेखात नसताना, केवळ छायाचित्रित प्रतींच्या आधारावर जमिनींना अकृषिक दर लावून कोट्यवधींच्या नुकसानभरपाईचे आदेश दिले गेले. नगर रचनाकारांची शिफारसही घेतलेली नव्हती, कर भरण्याचे पुरावेही नव्हते, तसेच प्रत्यक्ष बांधकामाचे पुरावे अनुपस्थित होते, असे सरवदे यांनी निदर्शनास आणले आहे.

सरवदे यांनी केलेल्या तक्रारीत पुढील मागण्या करण्यात आल्या आहेत. जास्तीची भरपाई घेतलेल्या भूधारक व अधिकाऱ्यांकडून १६ कोटींची रक्कम वसूल करावी, तत्कालीन उपविभागीय अधिकारी विकास माने यांच्यावर गुन्हा दाखल करून चौकशी करावी, भविष्यातील भूसंपादन प्रक्रियेत कठोर नियमावली लागू करावी, सदर प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई करावी. या तक्रारीमुळे भूसंपादनातील पारदर्शकतेच्या प्रश्नावर पुन्हा एकदा प्रकाश पडला आहे.



> भ्रष्टाचार करणाऱ्या अधिकाऱ्यांनी छापले अन् बदल्या करून गेले
>
> राष्ट्रीय महामार्ग २११ मध्ये अंदाजे १०० ते १५० कोटीचा भ्रष्टाचार झाला आहे. एक एक प्रकरण समोर येत आहे त्या अनुषंगाने तक्रार करत भ्रष्टाचार बाहेर काढणं सुरू आहे. उपविभागीय अधिकारी, उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी यांनी संगनमताने भ्रष्टाचार केला आणि तो उघड होण्याच्या अगोदर बदल्या करून गायब झाले. प्रशासनाने तक्रारीच्या अनुषंगाने सखोल चौकशी करून संबंधित अधिकाऱ्यावर निलंबनाची कारवाई करावी अशी मागणी विभागीय आयुक्त प्रधान सचिव यांच्याकडे केली आहे आता ते काय कारवाई करतात याकडे लक्ष लावून आहे.
>
> – अजय सरवदे
> जिल्हाध्यक्ष, वंचित बहुजन आघाडी बीड (प.)

## आ.सुरेश धस यांच्यावतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना हरित शुभेच्छा

आष्टी । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त पांढरी शिवारातील आंधळेवाडी रस्त्याच्या दुतर्फा वृक्षारोपणाचा भव्य उपक्रम राबवण्यात आला. हा उपक्रम आष्टी-पाटोदा-शिरूर कासार विधानसभा मतदारसंघाचे कार्यसम्राट आमदार सुरेश धस यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला.

पांढरी ते आंधळेवाडी आणि आष्टी शहरातील बाजार समितीच्या परिसरात आणि शेकापूर रोड परिसरात रस्त्याच्या दोन्ही बाजूंना लावण्यात आलेली ही झाडं भविष्यात गावात हरित पट्टा निर्माण करून सौंदर्यात भर घालणार असून पर्यावरणाच्या दृष्टीनेही अत्यंत उपयुक्त ठरणार आहेत. सामाजिक भान ठेवत पर्यावरण संवर्धनाचा सकारात्मक संदेश देणारा हा उपक्रम परिसरात कौतुकास पात्र ठरला आहे.

यावेळी आष्टी येथे माजी नगराध्यक्ष रंगनाथ धोंडे, गटनेते किशोर झरेकर, सभापती सुरेश वारंगुळे, सभापती शरीफ शेख, नगरसेवक बाळासाहेब घोडके, दीपक निकाळजे, समीर बेग, सादिक कुरेशी, भाऊसाहेब निंबाळकर, बबलू शेख, शहादेव नरोडे, आत्माराम फुंदे, सुरज रोकडे, बंटी धोंडे, पत्रकार शरद रेडेकर, सलीम कुरेशी, पांढरी येथे सरपंच सुधीर पठाडे माजी सरपंच प्रकाश वांढरे, जालिंदर वांढरे,बंडू देशमुख, गणेश शेळके उपसरपंच गोवर्धन शेंबडे, अंबादास भोगाडे, वाल्मीक वांढरे, दादा वांढरे, धोंडीबा बापू वांढरे, प्रकाश हंबर्डे, अमृत वांढरे, रमेश वांढरे, दादा शेळके, अंगद पेचे, नामदेव वांढरे, राम वांढरे तसेच या उपक्रमात आष्टी आणि पांढरी गावातील नागरिकांनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदवला.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT